महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
Tel. : 2642 4211 Extn. 3642 / Fax : 022-26581516
2nd floor, Prakashgad, Bandra (East), Mumbai – 400 051.
E-mail : pro@mahagenco.in / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ क्रमांक : मासं/जनसंपर्क/चतुर्थ वर्धापन दिन/स्पर्धा -२००९ /७०४५ दि. : १६/०५/२००९.

# परिपत्रक

**विषय : महानिर्मितीच्या चतुर्थ वर्धापनदिनानिमित्त कर्मचाऱ्यांसाठी स्पर्धा - उपक्रमांचे आयोजन.**

---

६ जून २००९ रोजी महानिर्मितीच्या स्थापनेला ४ वर्षांचा कालावधी पूर्ण होत आहे. या निमित्ताने सर्व कर्मचाऱ्यांसाठी पुढीलप्रमाणे विविध नाविन्यपूर्ण स्पर्धा- उपक्रम आयोजित करण्यास मा. व्यवस्थापकीय संचालक यांनी मंजुरी दिली आहे. या स्पर्धांमध्ये व्यक्तिगत पातळीवर निबंध स्पर्धा, सामुहिक पातळीवर यशोगाथा सादरीकरण स्पर्धा तसेच आंतरविद्युत केंद्र पातळीवर एक अभिनव स्पर्धा यांचे आयोजन करण्यात येत आहे.

**अ) <u>सर्व अधिकारी, कर्मचारी यांचेसाठी खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन</u>**

**विषय :** १) महानिर्मितीसमोरील आव्हाने आणि संधी
२) माझ्या महानिर्मितीसाठी मी काय करू शकतो?
३) महानिर्मितीची सध्याची कार्यपध्दती व तंत्रज्ञान या संबंधित अपेक्षित सुधारणा.

शब्दमर्यादा :- २००० शब्द (वरीलपैकी कोणत्याही एका विषयांवर निबंध) (भाषा मराठी)

निबंध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांमधून प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ अशी चार पारितोषिके अनुक्रमे रू. ५०००/-, ३०००/-, २०००/- व १०००/- याप्रमाणे प्रस्तावित करण्यात येतील.

**ब) <u>सामूहिक स्पर्धा - सादरीकरण स्पर्धा (Power Point Presentation of the Success Story achieved in Power Station)</u>**

महानिर्मितीच्या क्षेत्रीय कार्यालयांमध्ये क्वालिटी सर्कल, स्टडी ग्रुप इ. च्या माध्यमातून कार्यपद्धतीतील विविध सुधारणा साध्य केल्या जात असतात. विद्युत केंद्रातील विविध विभागात (उदा. बॉयलर, टर्बो जनरेटर, कोळसा हाताळणी - राख हाताळणी - तेल हाताळणी - विभाग, जल प्रक्रिया विभाग, मानव संशाधन विभाग, लेखा विभाग इ.) उद्भवणाऱ्या तांत्रिकी / अतांत्रिकी समस्यांवर मात करण्यासाठी या माध्यमातून नियोजनबद्ध प्रयत्न केले जात असतात. अशा प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी सोबतच्या नमुना प्रपत्राप्रमाणे सर्व माहिती सुयोग्यरित्या भरून प्रवेशिका आपापल्या क्षेत्रीय केंद्रप्रमुखाकडे सादर कराव्यात. केंद्रप्रमुखांमार्फत सदर प्रवेशिका छाननीनंतर मुख्यालयास प्राप्त होतील.